# केईआय इंडस्ट्रीजचे 'कॉन्फ्लेम' बाजारात

## अग्निरोधक : बहुमजली इमारतीसाठी अतिशय उपयोगी

**नागपूर, ता. ४ :** विजेची वायर तयार करणारी देशातील आघाडीच्या केईआय इंडस्ट्रीजने कॉन्फ्लेम अग्निरोधक पीव्हीसी इन्सुलेटेड वायरची नवीन श्रेणी बाजारात आणली आहे. केईआय कॉन्फ्लेम वायर बहुमजली इमारती, हॉटेल्स, रुग्णालय आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांसाठी उपयुक्त आहे. या वायरचा घरगुती उपकरणामध्येही वापर करता येतो.



संग्रहित छायाचित्र.

केईआयच्या कॉन्फ्लेम वायरला पीव्हीसी कंपाउंड आहे. सुरक्षाकवच म्हणून ते कार्य करते. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्यास सामान्य वायरमधून काळा व मनुष्याच्या जीवितासाठी हानिकारक धूर निघतो. यामुळे बचाव कार्यात अडथळे येतात. पण, केईआयने निर्माण केलेला कॉन्फ्लेम वायरमधील पीव्हीसी कंपाउंड आग पसरविण्यास अटकाव करते. सोबतच काळा धूर निर्माण होऊ देत नाही. कारण कॉन्फ्लेममध्ये अम्लीय प्रभाव निर्माण होत नाही, असे केईआय लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल गुप्ता यांनी सांगितले.

कान्फ्लेम अत्याधुनिक पद्धतीने तयार केले असून, अग्निरोधक आहे. कॉन्फ्लेम वायर आग लागल्यास वा जुना झाल्यास तुटणार नाही.

यामुळे कॉन्फ्लेम बहुमजली इमारती व्यावसायिक प्रतिष्ठानांची गरज बनली आहे. कॉन्फ्लेम वायर लाल, पिवळ्या, हिरव्या रंगात देशभरातील केईआय वितरक आणि वीज साहित्य विक्रेत्यांकडे उपलब्ध आहे.